● शुक्रवार, दि. ३१ जानेवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १८३ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जिवनामृता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# न्याय प्रविष्ट प्रकरणात प्रशासनाने हस्तक्षेप करु नये - ॲड. मगरे

## दलित, आदीवासी, भुमिहिन कास्तकरांचे अतिक्रमण नियमानूकूलित करुन सातबारा द्या

**जालना । प्रतिनिधी** - पोलीस प्रशासनाला हाताशी धरून शासन नियमबाह्य पद्धतीने गरिबांवर अन्याय करत आहे, हा अन्याय कदापि सहन करणार नसल्याचा ईशारा देत शिवसेना दलित आघाडीचे ॲड. भास्कर मगरे यांनी दलित, आदीवासी, भुमिहन कास्तकरांचे शेती प्रयोजनासाठी झालेले अतिक्रमण शासन निर्णय, मा. न्यायालयाचे आदेशानुसार नियमानूकूलित करून त्यांना सातबारा देण्याची मागणी केली आहे. न्याय प्रविष्ट प्रकरणांमध्ये प्रशासनाने हस्तक्षेप करु नये असेही ॲड. मगरे यावेळी म्हणाले. ते गुरुवार (दि ३०) शासकिय विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी कोठोरा जैनपूर (ता. भोकरदन), गणेशनगर (ता. जालना), राम नगर (ता. जालना) भागातील शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

यावेळी ॲड. मगरे म्हणाले की, कोठोरा जैनपुर येथील दलित, आदीवासी, भूमिहिनांचे कास्तपट्टे त्यांच्या नावे न करता जिल्हा महसूल प्रशासन कास्तकरांच्या कास्तपट्ट्यात येऊन त्यांची उभी पिके, झोपड्या, संसारोपयोगी साहित्यांची नासधूस करत आहे. कास्तकरांना मारहाण करुन गंभीर स्वरुपाचे फौजदारी गुन्हे दाखल करण्याची धमकी देण्यात येत आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून महसुल प्रशासनाने पोलीस प्रशासनाला हाताशी धरून या भागातील कास्तकऱ्यांवर अन्याय करत आहे. मुळात कठोरा जैनपुर प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे. या प्रकरणात प्रतिवादी हजर झाले असून त्यांनी लेखी म्हणणे देण्यास टाळाटाळ केली आहे.

गणेशनगर भागातही गेल्या दोन दिवसांपासून कास्तकऱ्यांना हटविण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून होत आहे. रामनगर भागातील परिस्थितीही वेगळी नाही. रामनगर येथील गायराण प्रकरण उपविभागीय अधिकारी यांच्याकडे न्याय प्रविष्ठ असतांना प्रकरणात निकाल दिल्या जात नाही. तर दुसरीकडे तहसिलदार जालना यांनी १२ बेकायदेशिर सातबारा दिला आहे. याची सुध्दा चौकशी करण्यात यावी, अशी मागणीही ॲड. मगरे यांनी केली आहे. एवढेच नव्हे तर मा. न्यायालयाचा आदेशाचा चुकीचा अर्थ लावून कास्तपट्टे हे बेकादेशीर असल्याचे दाखवून ते हिसकावून घेण्याचा प्रयत्न महसूल विभागाकडून होत आहे. हा. एकप्रकारे मा. न्यायालयाचा अवमान आहे. आणि हि बाब मा. न्यायालयास निदर्शनास आणून देण्यात येणार असल्याचेही ॲड. मगरे यांनी म्हटले आहे.

शासन निर्णय २८ नोव्हेंबर १९९१ अधिनियमातील तरतुदीनुसार सन १९६८-६९ ते सन १९९० पर्यंतचे अतिक्रमण हे दलित, अदिवासी, भूमिहिन यांच्या नावे करून सातबारा देणे अपेक्षित होते. त्यानंतर २८ जानेवारी २०११ मा. सर्वोच्च न्यायालयाच्या एका निर्णयानंतर शासनाने १२ जुलै २०११ शासन निर्णय काढत २८ नोव्हेंबर १९९१ अधिनियमातील तरतुदी कलम ६ आणि ७(४) कायम ठेवून कलम ८ मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शेती प्रयोजनाव्यतिरिक्त बेकायदेशीर असलेले अतिक्रमण निष्काशीत करण्याचे अधिकार मा. तहसीलदार यांना ९(२) नुसार देण्यात आल्याची तरतुद केली. मात्र, जिल्हा प्रशासन व तहसीलदार शासन निर्णय १२ जुलै २०११ अधिनियमातील तरतुदीचे चुकीचे अर्थ लावून कलम ७(४) चे उल्लंघन करीत आहे. महसुल विभागाने मा. न्यायालय व शासन निर्णयाची योग्य ती अंमलबजावणी करावी व केवळ बेकायदेशीर असलेल्यांनाच निष्काशीत करावे, न्याय प्रविष्ट असलेल्या प्रकरणाकडे महसूल विभागाने निकाल लागेपर्यंत वाट पाहावी.



असे म्हणून गोर गरिबांवर पोलीस प्रशासनाच्या मदतीने चालविलेला अन्याय कदापि सहन करणार नाही. शिवसेना दलित आघाडीच्यावतीने यापुर्वी देखील शेकडो आंदोलने करण्यात आली. जालना ते मुंबई लॉंग मार्च काढण्यात आला होता. त्यावेळी विभागीय महसुल आयुक्त सुनील केंद्रे यांनी लॉंगमार्च बदनापूर मुक्कामी थांबवून दलित आदीवासी भूमिहिन कास्तपट्टे नावे करून सातबारा देण्याबाबत लेखी आश्वासन दिले होते. त्यानंतर शिवसेना दलित आघाडीकडून वेळोवेळी आंदोलने करण्यात आली. मात्र, गोर गरिबांकडे लक्ष द्यायला यांच्याकडे वेळ नाही, निमाज काळात होणारा अत्त्याचाराप्रमाणेच हे शासन अत्त्याचार करत असल्याचा आरोपही ॲड. मगरे यांनी केला आहे. या गंभीर प्रकरणाकडे पालकमंत्री पंकजा मुंडे व आ. अर्जुनराव खोतकर यांनी लक्ष घालून कास्तकरांना न्याय द्यावा अशी विनंतीही ॲड. मगरे यांनी यावेळी केली.

महसुल प्रशासनाने शासन निर्णय व मा. न्यायालयाच्या निर्णयाचा मान ठेवून कास्तकरांच्या नावावर सातबारा करावा अन्यथा भविष्यात मोठे आंदोलन उभारण्यात येणार असल्याचा ईशाराही पत्रकार परिषदेच्या शेवटी ॲड. भास्कर मगरे यांनी दिला आहे.

### राजकारण्यांच्या बेकादेशीरित्या नावावर केलेल्या शासन जमिनी ताब्या घ्या

माजी खासदार रावसाहेब दानवे, माजी मंत्री राजेश टोपे, आ. नारायण कुचे यांनी विविध शासकीय जमिनीवर अतिक्रमण केलेले आहे. अनेक जमिनींचे वादही झाले. मात्र, कालांतराने त्यांना शासनाच्या जमिनी त्यांच्या नावावर करून देण्यात आल्या. याची सर्व हिस्टरी माझ्याकडे असल्याचे ॲड. भास्कर मगरे यांनी म्हटले असून या मात्तबर राजकारण्यांसाठी एक न्याय आणि दलित, आदीवासी, भुमिहिन कास्तकऱ्यांसाठी एक न्याय असे का? असा प्रश्न उपस्थित करत या राजकारण्यांच्या बेकायदेशीरीत्या नावावर केलेल्या जमिनीही शासनाने ताब्यात घ्याव्यात अशी मागणीही ॲड. मगरे यांनी केली.

---

युवा आदर्श

### कृषीवल ...

हात लागे परिसाचे
भारत कृषी प्रधान
सांभाळावी परंपरा
ठेवून नीत अवधान
कृषी ऋषी लाभले
भारतभूला वरदान
विविधतेने नटविले
निसर्गे दिले खदान
आपदा विपदा येती
पुन्हा मिळे जीवदान
विचारवंत कृषिमित्र
होई आदान प्रदान
बळीराजा राज्य हे
माना खरे समाधान
पोशींदा दु:खी नको
रहावे नीत सावधान
नको उपाशी कृषक
रहावेसदोदित भान
बळीराजा आंदोलन
उपाय अंती बेभान
कृषी श्रेष्ठ वसा घ्या
जपारे नीत सन्मान
महाराष्ट्र हा धष्टपुष्ट
ताठ सदोदीत मान

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

झाडे लावा
झाडे जगवा

---

# पाणी पुरवठा योजनेतंर्गत खोदकामा दरम्यान अस्थी बाहेर आल्याने जालन्यात खळबळ

## स्मशानभुमीस संरक्षण भिंत बाधून देण्याच्या आश्वासनानंतर वाद निवळला



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील जुना जालना भागातील उड्डाण पुलाजवळील स्मशानभुमीच्या जागेवर पाणी पुरवठा योजनेतंर्गत सुरु असलेल्या खोदकामा दरम्यान अस्थी बाहेर आल्याने एकच खळबळ उडाली.

जालना शहर महानगर पालिकेच्या सुर्वणजयंती अभियानातून जालना-जायकवाडी पाणी पुरवठा योजनेचे उड्डाण पुलाजवळ असलेल्या स्मशानभुमी लगत खोदकाम सुरु असतांना अचानक अस्थी बाहेर आल्याने काही काळ तणाव निर्माण झाला होता. या घटनेची माहिति मिळताच घटनास्थळी मनपा अधिकाऱ्यांसह कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सिद्धार्थ माने, ज्ञानदेव नागरे, शिंदे, जावडे आदींनी धाव घेतली. मनपा अधिकारी व पोलीस प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या मध्यस्थीनंतर परिस्थती नियंत्रणात आली. स्मशानभूमी पसिरात संरक्षण भिंत बांधून देणार असल्याचे आश्वासन मनपा अधिकाऱ्यांकडून देण्यात आल्यानंतर वाद निवळला. तसेच बाहेर आलेल्या अस्थीचे विधीवत पूजन करून दफनविधी मनपा प्रशासनाच्यावतीने करण्यात येणार असल्याचे उपायुक्त नंदा गायकवाड यांनी सांगितले.

# अवैधरित्या वृक्षतोड करुन वाहतुक करणाऱ्या टेम्पो वन विभागाने पकडला

## बदनापूर तालुक्यातील वाकुळणी येथे वन विभागाची कारवाई



**जालना । प्रतिनिधी -** अवैधरित्या वृक्षतोड करून वाहतूक करणाऱ्या टाटा टेम्पो ४०७ जालना वन विभागाने पकडला. बदनापूर तालुक्यातील वाकुळणी येथे ही कारवाई करण्यात आली.

वाकुळणी येथे पांढऱ्या रंगाच्या ताडपतरी झाकलेल्या टाटा टेम्पो ४०७ क्र. Mh 20 CT 3948 मधून अवैधरित्या कडूलिंब आणि इतर प्रजातीच्या झाडांचे लाकडाची वाहतूक केली जात असल्याची माहिती जालना वन विभागाच्या पथकाला मिळाली होती. त्या माहिती वरून वन विभागाच्या पथकाने कारवाई करून लाकडाची वाहतूक करणारा टाटा टेम्पो वाहन ताब्यात घेतलंय.

दि. २८/०१/२०२५ रोजी मिळालेल्या गुप्त माहिती वरुन मौजे वाकुळणी ता. बदनापुर जि. जालना या ठिकाणी वन विभागाला पांढऱ्या रंगाची ताडपतरी झाकलेले टाटा टेम्पो ४०७ क्र. चक-२०उढ ३९४८ रस्त्यावरून जाताना दिसुन आले. त्याची तपासणी केली असता त्यामध्ये अवैधरित्या वृक्षतोड करुन कडुलिंब व इतर आडजात प्रजातीचे माल पान २ वर

---

# मुलांना ही उच्च शिक्षण मोफत करा - दीपक रणनवरे

## विभागीय आयुक्तांकडे पायी जाऊन देणार निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समिती यांच्यावतीने ब्राह्मण समाजाच्या प्रलंबीत मागण्यांसाठी दिनांक १५,१६, १७ फेब्रुवारी रोजी जालना ते संभाजीनगर विभागीय आयुक्तांकडे पायी जाऊन ब्राह्मण समाजाच्या प्रलंबित मागण्याचे निवेदन देणार अशि माहिती मुख्य समन्वयक दीपक रणनवरे यांनी दिली आहे .



सर्वांना शैक्षणिक क्षेत्रातील वेगवेगळ्या संधी उपलब्ध होणे गरजेचे आहे परंतु मुलं हुशार असुनही कुटुंबांची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने त्यांना जे शिक्षण द्यायचे ते पैशा अभावि घेता येत नाही यात देशाचे ही खूप नुकसान होते म्हणून शासनाने खालील मागण्यांचा विचार करून मागण्या मान्य कराव्यात

सर्व समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मोफत करण्यात यावे

ब्राह्मण समाजातील विद्यार्थी,विद्यार्थीनीं साठी प्रत्येक जिल्ह्यात स्वतंत्र वस्तीगृह उभारावे / स्थापन करण्यात यावे.

तसेच भगवान परशुराम भुवन निर्माण करण्यात यावे.

पोरोहित्य करणाऱ्या बंधूंना मासिक ५०००/- रु. मानधन देण्यात यावे. ब्राह्मण पान २ वर

# जालन्यात येत असलेल्या सहकार दिंडीच्या स्वागताची जय्यत तयारी

**जालना । प्रतिनिधी** - आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त भारत सरकारने विविध उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला असून, अंतर्गत सहकार चळवळीला बळकटी देण्यासाठी काढण्यात आलेली नागपूर ते शिर्डी सहकार दिंडी १ फेब्रुवारी रोजी जालना मुक्कामी येणार आहे. दिंडीच्या स्वागताची आणि २ फेब्रुवारी रोजी काढण्यात येणाऱ्या शोभायात्रेची जय्यत तयारी सुरू आहे. त्यात सर्व सहकारी संस्थांचे पदाधिकारी, कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन सहकार चळवळ मजबूत करावी, असे आवाहन सहकार दिंडीचे स्वागताध्यक्ष आ. खोतकर



यांनी केले आहे.

सहकार दिंडीच्या अनुषंगाने गुरुवार दि. ३० जानेवारी रोजी प्रियदर्शनी बँकेत जिल्हा उपनिबंधक श्री. वरखडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होऊन सहकार दिंडीच्या स्वागताचे नियोजन करण्यात आले. याप्रसंगी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष अभय कुलकर्णी, सहकार भारतीचे अध्यक्ष सचिन वाणी, सहाय्यक निबंधक हुशे, सहाय्यक निबंधक वाघमारे, शरद तनपुरे, जालना मर्चंट बँकेचे अध्यक्ष सीए गोपाल अग्रवाल, जालना पीपल्स बँकेचे संचालक सतीश पंच, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष सतीश टोपे, राजाभाऊ देशमुख, राजेश राऊत, महाराष्ट्र पतसंस्था फेडरेशनचे खजिनदार दादाराव तुपकर, उपाध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार, कृषी पान २ वर

## संपादकीय

# गोर-गरिब व शेतकऱ्यांचे सरकार?

नांदेड- जालना समृद्धी महामार्गासाठी देवमुर्ती परिसरातील जमिनी घेताांना देण्यात येणारा मोबदला हा अत्यल्प असल्याचा आरोप करत त्या परिसरातील बाधीत शेतकऱ्यांनी आक्रमक पाऊल उचलत थेट आत्मदहनाचा ईशारा दिला आहे. एकीकडे गतीमान शासन, गोर-गरीबांचे सरकार, शेतकऱ्यांचे सरकार अशी ओरड मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सत्ताधारी नेते मंडळी करत असतात. नुकतेच जालना शहरात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आभार दौऱ्यानिमित्ताने येऊन गेले. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आपल्या भाषणात लाडकी बहिण, लाडके भाऊ, लाडके शेतकरी असा उल्लेख केला. आणि येथील समस्या सोडविण्याचे आश्वासन जालनेकरांना दिले. हे सरकार गोरगरीब आणि शेतकऱ्यांचे सरकार असल्याचा पुर्नउच्चार त्यांनी जालन्यात केला. मात्र, गोर गरिबांच्या आणि शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकायला देखील शासनाला वेळ नसल्याचे दिसून येत आहे. नांदेड-जालना समृद्धी महामार्गासाठी देवमुर्ती परिसरातील शेतकरी उपोषणाला बसले, आत्मदहनाचा ईशारा दिला मात्र, त्याची साधी दखलही प्रशासनाने घेतली नाही. त्यांना विचारायला प्रशासनातील कोणातही अधिकारी-कर्मचारी उपोषणस्थही आला नाही. आत्मदहनासारखा गंभीर ईशारा दिल्ययानंतरही सरकार आणि शासन याकडे दुर्लक्ष करीत असले तर हे कसले गरिबांचे आणि शेतकऱ्यांचे सरकार असेच म्हणावे लागेल. दुसरा विषय दलित, आदिवासी, भुमिहीन कास्तकरांचा. शासनाच्या जमिनीवर अतिक्रमण केलेल्या कास्तकरांना १९९० च्या अधिनियमानुसार शेती प्रयोजनासाठी झालेले अतिक्रमण नियमानूकूलित करण्याचे शासन निर्णय आहे. मध्यला काळात मा. न्यायालयाचा निर्णय जाने २०११ मध्ये आला त्यानंतर शासनाने तातडीने जुलै २०११ मध्ये पुन्हा निर्णय दिला. १९९० पुर्वीच्या शेती प्रयोजनासाठीच्या अतिक्रमणीत जमिनी ह्या त्यांच्या नावावर करून त्यांना सातबारा देणे अपेक्षित होते. मात्र, जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील कोठोरा जैनपुर मध्ये महसुल प्रशासनाने पोलीस प्रशासनाचा वापर करत या कास्तकरांच्या जमिनीवरील पिकांची नासधूस केली. घरे (झोपड्या) पाडली, संसारोपयोगी साहित्याची नासधूस केली. एवढेच नव्हे तर देव घरातील देव मुर्तींचीही तमा त्यांनी बाळगली नाही. एका डालीमध्ये कोंबड्या होत्या त्या कोंबड्यासहीत त्या डालीवर बुलडोझरचा दणका देत कोंबड्यांना गतप्राण केल्या गेले. या गोर गरीबांना संसारोपयोगी साहित्य घेण्यासाठी आणि घराला घरपण देण्यासाठी किती मेहनत घ्यावी लागली असेल आणि आपला उदरनिर्वाह चालवितांना ज्या शेतमालाच्या भरवश्यावर ते होते ते शेतपिकच आडवे केल्याने आता या गोर गरीबांनी काय करावे असा प्रश्न त्यांच्यासमोर आहे. यालाच गरिबांचे आणि शेतकऱ्यांचे सरकार म्हणावे का? दुसरीकडे राजकारणी, धनदांडगे मात्तबरांच्या जमिनी रस्त्यासाठी घेतांना देण्यात येणारा मोबदला किती टक्क्यांनी वाढवून दिलाा जातो. त्याचा रेडीरेकरनुसार अथवा बाजार मुल्यांनुसार काय दर ठरविला जातो हे देखील पाहणे गरजेचे आहे. तर ह्याच धनदांडगे, राजकारणी, मात्तबरांकडून शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून या नात्या नियमात बळजबरीने बसवून अथवा सऱ्हास बेकायदा शासकीय जमिनी त्यांच्या घशात घातल्या जातात. तेव्हा मा. न्यायालयाचा आदेश, शासनाचा निर्णय कुठे जातो? तेव्हा हे महसुल अधिकारी कसे धावतात, थोडक्यात श्रीमंतांसाठी या शासन आणि सरकारकडे वेगळा न्याय आणि गोर-गरीब शेतकऱ्यांसाठी वेगळा न्याय असल्याचे अधोरेखित होत आहे. त्यामुळे आत्मदहनाचा ईशारा देण्याऱ्या शेतकऱ्यांना आत्मदहन करू द्यावे, तसेच दलित, आदीवासी, भुमिहिन कास्तकरांना पडीक शासकीय जमिनीवरून बेदखल करून त्यांना उघड्यावर आणावे तरच आणि तरच या सरकारला शंभर टक्क्यात गोर-गरिबांचे व शेतकऱ्यांचे सरकार म्हणता येईल, आता असेच म्हणावे लागेल.

## वाचकांचे मनोगत

### नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणीही पाहाव्यात...

स्वातंत्र्यसैनिकांनी ब्रिटिशांना घालवून देशाला स्वातंत्र्य मिळून दिले.देशातील असंख्य नागरिकांनी स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला होता, सलाम त्या शूरवीरांना,स्वातंत्र्यसैनिकांना तमाम देशप्रेमींना , हातात आलेली सत्ता जावू नये म्हणून नाना क्लृप्त्या काढून आपले मतदार कायम आपल्याच सोबत राहावेत म्हणून वेगवेगळ्या प्रकारची आमिषे,सवलती,सुविधा नियम बाह्य पद्धतीने देणे म्हणजे मतदार संघ बांधण्याची कला.मुंबई आणि अन्य शहरात झोपडपट्ट्या उगम ,धार्मिक स्थळांवरील भोंगा ,पदपथावर टपर्या,दुकाने,भाजी विक्रेते यामागे मतांची बेरीज आहे.नागरिकांना उपद्रव झाला तरी चालेल त्याकडे डोळेझाक करून वेळ मारून नेण्यात पटाईत असतात. नुकताच मुंबई उच्च न्यायालयाने कोणत्याही धार्मिक स्थळावरील भोंगा धार्मिक प्रथेचा भाग नसल्याने धार्मिक स्थळांवरील ध्वनिप्रदूषण करणार्या विरोधात कारवाई करावी असे स्पष्ट निर्देश दिले आहेत. नागरिकांना भेडसावत असलेल्या अडचणीकडे मा.उच्च न्यायालयाने पाहावे. तेव्हाच अनधिकृत झोपड्या, पदपथावरील टपऱ्या, दुकाने, भाजी विक्रेते यांना आळा बसेल.

**महादेव गोळवसकर, मुंबई**
मो. ९८६९४७६२०९ mahadeogolvaskargmail.com

# खोट्या तक्रारी करून हिंदूंना जाणीवपूर्वक त्रास देणाऱ्या तिस्ता सेटलवाड आणि 'सी.जे.पी.' संस्थेवर कारवाई करा!

## हिंदु जनजागृती समितीची मुंबई सहपोलीस आयुक्तांकडे तक्रार

**मुंबई** - हिंदू संघटना, हिंदुत्वनिष्ठ नेते, तसेच हिंदु जनजागृती समिती यांच्या विरोधात खोट्या तक्रारी दाखल करून पोलीस यंत्रणेचा दुरुपयोग करणार्या तिस्ता सेटलवाड आणि त्यांच्या 'सिटिझन्स फॉर जस्टीस अँड पीस' (सी.जे.पी.) या संस्थेवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी हिंदू जनजागृती समितीने केली आहे. मुंबईचे सहपोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) श्री. सत्यनारायण चौधरी यांना या संदर्भात तक्रार सादर करण्यात आली.

तक्रारीच्या वेळी हिंदु जनजागृती समितीचे मुंबई जिल्हा समन्वयक श्री. बळवंत पाठक, भूमीपुत्र सामाजिक संस्थेचे अध्यक्ष श्री. सुभाष अहिर, मानव सेवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्री. विनायक शिंदे, श्री परशुराम तपोवन आश्रमचे (वसई) सदस्य श्री. संदीप तुळसकर, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे संघटक श्री. विलास निकम, समितीच्या रणरागिणी शाखेच्या सौ. स्नेहल गुरव, आणि 'राष्ट्रभक्त अधिवक्ता समिती'चे अधिवक्ता अनिश परळकर उपस्थित होते.

सी.जे.पी.' संस्थेच्या कारवायांमागे हिंदुविरोधी कटाचा संशय : हिंदुत्वनिष्ठ संघटना आणि हिंदू नेत्यांविरुद्ध खोट्या तक्रारींची मालिका उभी करून सामाजिक तेढ निर्माण केली जात आहे. या कारवायांसाठी राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरून फंडिंग घेतले आहे का, तसेच यामागे 'डिप स्टेट' आणि 'शहरी नक्षलवाद' यांचे काही देश व हिंदु विरोधी कटकारस्थान आहे का, याची चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी समितीने केली आहे.

तिस्ता सेटलवाड यांच्यावर आधीपासून गंभीर आरोप : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविरोधात खोटे आरोप करणे, न्यायालयात खोटे पुरावे सादर करणे आणि साक्षीदारांना खोट्या साक्षीसाठी फूस लावणे, आर्थिक गैरव्यवहार आणि विदेशी निधीतील घोटाळे करण्यासंदर्भात आरोप सेटलवाड व तिच्या संस्थेवर झालेले आहेत.





**हिंदूंवर खोट्या तक्रारी दाखल करून छळ** : हिंदू संघटनांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होत आहे, ज्यात भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १९(१)(अ) अंतर्गत मिळालेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याचाही समावेश आहे. समितीच्या उपक्रमांमुळे कधीही कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला नाही.

तक्रारीची प्रत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, गृह सचिव, आणि महिम पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनाही देण्यात आली आहे.

# कुंभचे मानसिक दृष्टिकोनातून महत्त्व

कुंभ मेळा भारतीय महान संस्कृती आणि श्रध्देचे प्रतीक आहे. त्याचे महत्त्व केवळ आध्यात्मिकतेपुरते मर्यादित नाही, तर ते मानसिक स्वास्थ्य, आत्मचिंतन आणि सामूहिक उर्जेचा अनुभव घेण्याचे एक अद्वितीय व्यासपीठ आहे. लाखो श्रद्धाळू आणि साधक जेव्हा या मेळ्यात सहभागी होतात, तेव्हा ते त्यांच्या मन, बुध्दी आणि आत्म्याच्या शुद्धीच्या दिशेने वाटचाल करतात. या वर्षीचा महाकुंभ असल्याने, तो मानवाच्या मनावर अधिक सकारात्मक प्रभाव पाडणारा आहे.

**आध्यात्मिक शांतता आणि मानसिक स्थैर्य**: कुंभ मेळ्याचे भक्तिमय वातावरण म्हणजे सकारात्मक ऊर्जा आणि आत्मिक शांततेचा स्रोत आहे. गंगा, यमुना आणि अदृश्य सरस्वतीच्या संगमावर स्नान केल्याने आत्म्याची शुद्धी आणि पापांपासून मुक्ती मिळते, अशी श्रद्धा आहे. ही धार्मिक आस्था मनाला नकारात्मकतेपासून मुक्त करते आणि मानसिक शांतता आणि स्थैर्य प्रदान करते.

**सामूहिक साधना आणि संघभावाची वृध्दी करणारा** : कुंभ मेळ्यात कोट्यवधी लोक सामूहिकपणे ध्यान, प्रार्थना आणि भक्तीत लीन होतात. या सामूहिक साधनेतून मिळणारी सकारात्मक ऊर्जा एक अद्वितीय मानसिक अनुभूती देते. अशा सोहळ्यांमध्ये सहभागी झाल्याने व्यक्तीला दैनंदिन जीवनातील ताणतणाव आणि चिंतांपासून मुक्ती मिळते. जीवनाला नवीन दिशा मिळते. उदाहरण बघायचे तर एका विदेशी चित्रकाराने सांगितले की, ते कुंभ मेळ्यात रंगांचा संगम पाहण्यासाठी आले होते, परंतु येथे आल्यानंतर येथील भक्ती, श्रद्धा, अनुष्ठान, संघटन, आपुलकी, सांस्कृतिक महानता यांमुळे ते प्रभावित झाले. त्यांनी भारतीय आध्यात्मिक मूल्ये जाणून घेतली आणि त्या मार्गावर चालण्यास सुरुवात केली. असे अनेक अनुभव कुंभ मेळ्यात बघायला मिळतात. हे सामूहिक उपासनेचे आणि संघभावाचे सकारात्मक परिणाम आहेत.

**आत्मविश्वास आणि मानसिक सुदृढता**: कुंभ मेळ्यात दररोज साधू-संत आणि विद्वानांचे प्रवचन असतात. सामूहिक अनुष्ठान, नामजप आदी अखंडपणे सुरू असत. यामुळे इथे येणाऱ्याचे मन स्थिर होण्यास मदत होते. संतांच्या जीवनदर्शन आणि आध्यात्मिक मार्गदर्शनाने व्यक्तीला जीवनातील समस्यांना सामोरे जाण्याची दिशा मिळते. व्यक्तीतील विवेक जागृत होतो. त्यामुळे जीवनातील गुंतागुंती समजून घेण्यासाठी आणि त्यावर सोपे उपाय शोधण्यासाठी प्रेरणा मिळते. श्रद्धा वाढल्यामुळे व्यक्तीचा आत्मविश्वास वाढतो. ज्यामुळे तो जीवनातील आव्हानांना सामोरे जाऊ शकतो.

**आत्मचिंतन आणि आत्मिक विकास**: कुंभ मेळ्याचा अनुभव व्यक्तीला आत्मचिंतन आणि आत्मिक विकासाच्या दिशेने प्रेरित करतो. व्यक्तीच्या अंतर्मुखतेत वाढ होऊन जीवनातील व्यापक दृष्टिकोन तयार होतो. हा मेळा केवळ धार्मिक नाही, तर मानव जीवनाचा उद्देश समजून घेण्यासाठी आणि आत्म्याच्या उन्नतीसाठी एक व्यासपीठ आहे. आत्मचिंतन हे मानसिक आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे, आणि कुंभमेळा यासाठी एक अप्रतिम संधी प्रदान करतो. देश-विदेशातील उद्योजक, कलाकार, वैज्ञानिक इत्यादी येथे आत्मचिंतन करण्यासाठी येतात. येथे आल्यावर त्यांना जीवनात सकारात्मक बदलांचा अनुभव येतो.

**संस्कृती आणि सामुदायिक एकतेचा आविष्कार**: कुंभ मेळा विविध संस्कृती आणि समाजातील लोकांना एकत्र आणतो. हा अनुभव मनाला व्यापक करणारा आहे. विविध भागांतून आलेल्या लोकांशी संवाद साधल्याने आणि सहभाग घेतल्याने व्यक्ती मानसिकदृष्ट्या सशक्त होते आणि सामाजिक जबाबदाऱ्यांबद्दल जागरूक होते. सर्व लोक आपापल्या जाती, धर्म, पद, संप्रदाय यापेक्षा केवळ हिंदु म्हणून कुंभमेळ्यात सहभागी होतात. त्यामुळे इथे भारतातील विविध संस्कृती आणि उपसना यांचा संगम अनुभवायला मिळतो. कुंभमेळा म्हणजे सामुदायिक एकतेचा आविष्कार म्हंटल्यास वावगे ठरणार नाही.

**नैसर्गिक वातावरण आणि मानसिक स्वास्थ्य**: त्रिवेणी संगमाच्या तीरावर असलेल्या कुंभ मेळ्याचे नैसर्गिक वातावरण मनाला शांतता आणि आनंद देते. पाणी, डोंगर, आणि मोकळ्या आकाशात व्यतीत केलेला वेळ मानसिक समाधानाचा अनुभव देतो. या नैसर्गिक सौंदर्यामुळे व्यक्ती तणावमुक्त होतो आणि मानसिक ऊर्जा प्राप्त होते.

हे बघता कुंभ मेळा केवळ एक धार्मिक उत्सव नाही, तर तो मानसिक आणि भावनिक आरोग्यासाठी एक अद्वितीय पर्वणी आहे. येथील वातावरण, साधू-संतांचे मार्गदर्शन, आणि सामूहिक भक्ती इत्यादी व्यक्तीला मानसिक स्थिरता, शांतता आणि नवीन ऊर्जा प्रदान करतात. कुंभ मेळ्याचा अनुभव जीवनाला नवी दृष्टी, संतुलन आणि सकारात्मकता प्रदान करणारा एक प्रभावी मार्ग आहे. या कुंभमेळ्यातील मिळाली ऊर्जा टिकून राहण्यासाठी आणि मानवाचे मनःस्वास्थ्य उत्तम राहण्यासाठी धर्मरक्षण होणे गरजेचे आहे. परंतु सध्या सर्वत्र हिंदु धर्मावर आघात होत आहेत. त्यासाठी हिंदूंनी संघटित होणे आणि धर्म रक्षणासाठी संघटित प्रयत्न करणे आवश्यक आहे. याविषयीचे मार्गदर्शन करणारे प्रदर्शन हिंदू जनजागृती समितीतर्फे महाकुंभ क्षेत्री लावण्यात आले आहे.

कैलाशपुरी भारद्वाज मार्ग चौक, भारद्वाज पोलीस ठाण्याच्या मागे, सेक्टर ६, कुंभ क्षेत्र, प्रयागराज येथे १० जानेवारी २०२५ ते १४ फेब्रुवारी २०२५ दरम्यान, सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत आयोजित केले आहे.

सर्व भक्तांनी आणि जिज्ञासूंनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा. या प्रदर्शनाला भेट देऊन, राष्ट्र आणि धर्माशी संबंधित शंकांचे निरसन करून घ्यावे.



सद्गुरु (डॉ.) चारुदत्त पिंगळे

**संकलकः**
**सद्गुरू डॉ. चारुदत्त पिंगळे**
**राष्ट्रीय मार्गदर्शक,**
**हिंदू जनजागृती समिती**

पान १ वरुन

## अवैधरित्या वृक्षतोड ...

आढळुन आले. वन विभागाच्या पथकाने टेम्पो चालकाला वाहतूक व तोड परवाना सदरबात विचारपूस केली असताना त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याने त्यानुसार सदर वाहन जप्त करुन वनविभागाने ताब्यात घेतले. दिनांक २९ बुधवार रोजी सदर टेम्पो मालका विरुध्द भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ७४, ४१, ४९, ५२ (१), महाराष्ट्र वृक्षतोड अधिनियम १९६४ चे कलम ०१ व ०३ अन्वये वनगुन्हा नोंद करण्यात आला आहे. या प्रकरणातील पुढील तपास जालना वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय हे करत आहे.

सदर कार्यवाही हि मा. श्रीमती सुवर्णा माने, उप वनसंरक्षक, छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली एस. एन. मुंढे, सहाय्यक वनसंरक्षक (रोहयो व वन्यजीव) जालना, के. डी. नागरगोजे, वनपरीक्षेत्र अधिकारी जालना प्रा. उत्तर, एस.जे. शिनगारे, वनपाल बदनापुर, डिव्ही. पवार, वनपाल भोकरदन, बालाजी घुगे, वनपाल जालना महादेव कळमकर, वनक्षक काजळा, सुदाम राठोड, वनरक्षक उज्जैनपुरी, व इतर कर्मचारी यांचा सहभाग होता.

## मुलांना ही ...

समाजाच्या सुरक्षिततेसाठी विशेष कायदा करुन सामाजिक विडंबनातुन मुक्तता करण्यात यावी.

परंपरागत राज्यातील मंदिरे

ज्या त्या पुर्ववत वंशपरंपरागत व्यवस्थापनाकडे हस्तांतरित करण्यात यावी, जेणेकरुन मंदिराचे पावित्र्य व व्यवस्थापन सुस्थितीत अबाधित राहील.

ब्राह्मण समाजाच्या सामाजिक, आर्थीक व शैक्षणीक पातळीवर झालेल्या बदलाचा चांगला वाईट परिणाम शोधण्यासाठी अभ्यास गटाची / आयोगाची शासनस्तरावर नेमणुक करण्यात यावी.

भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळासाठी निधी वाढुन द्यावा व लवकरात लवकर महामंडळाचे जिल्हा पातळीवर कार्य सुरू करावे.

या सर्व मागण्या साठी समस्त ब्राह्मण समाज संघर्ष समितीच्या वतीने निवेदन देणार आहे.

या साठी अँड बलवंत नाईक विनायक महाराज फुलब्रीकर एस व्ही देशपांडे आर आर जोशि सुरेश मुळे अँड आर जी देशमुख सुनील जोशी चंद्रकांत कुलकर्णी संजय देशपांडे अनंत वाघमारे राजेश सामनगावकर श्रीनिवास पोखरीकर अँड दीपक नाईक दीपक त्रिवेदी महेश भालेराव दिलीप देशपांडे संतोष दाणी संजय जोशी शिवाजी जोशी मोहन मुळे अभय शिवनगिरीकर अमीत कुलकर्णी सुमीत कुलकर्णी गजेंद्र देशमुख गणेश लोखंडे अँड विनोद कुलकर्णी दिपक महारोळकर अमोल भाले पवन देशमुख संकेत मोहिदे प्रसाद पाटील लक्ष्मीकांत कुलकर्णी शशिकांत दाभाडकर अरविंद देशपांडे सुनंदा बदनापुरकर विशाखा नाईक सुजाता कुलकर्णी आशा भाले राधिका निंबाळकर प्रदिप देशपांडे लक्ष्मीकांत दाभाडकर संतोष जोशी प्रशांत कुलकर्णी वल्लभ जवळेकर रोहिणी देशपांडे मैत्र ग्रुपचे सर्व सदस्य राज्य समन्वयक धनंजय कुलकर्णी, श्रीकांत जोशी, इश्वर दिक्षीत विजया आवस्ती अशोक वाघ अनिल दिक्षित अर्चना सुरडकर भगवान पाटील दिपा देशपांडे प्रज्ञा भिडे प्रफुल्ल कुलकर्णी रमेश देशपांडे अनिल डोईफोडे संतोष कुलकर्णी अँड योगेश उन्हाळे मंदार कुलकर्णी मधुसूदन दंडारे यांच्या सह समाज बंधू भगिनीं परिश्रम घेत आहे अशी महिती मुख्य समन्वयक दीपक रणनवरे यांनी दिली आहे.

## जालन्यात येत ...

उत्पन्न बाजार समितीचे श्री. राठोड यांच्यासह सहकार क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी दिंडीचे आगमन झाल्यानंतर ७ वाजता महेश भवन येथे स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले असून, आ. अर्जुनरावजी खोतकर यांच्या अध्यक्षतेखाली हा समारंभ पार पडणार आहे. स्वागत सोहळ्यानंतर सहकार विषयक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, बँका, कृषी उत्पन्न बाजार समित्या, मच्छीमार संस्था, फळबाग संस्था, नागरी सहकारी पतसंस्थांचे पदाधिकारी आणि व्यवस्थापक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. २ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता स्वागताध्यक्ष आ. अर्जुनरावजी खोतकर यांच्याहस्ते सहकार ध्वजारोहण करण्यात येणार असून, त्यानंतर भव्य सहकार शोभायात्रा काढण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, बडी सडक, सदर बाजार पोलीस स्टेशन, मामा चौक, महावीर चौक, मुथा बिल्डिंग, मस्तगड, गांधी चमन, शनी मंदिर, कचेरी रोड मार्गे मुक्तेश्वर लॉन्स असा या शोभायात्रेचा मार्ग आहे. या शोभायात्रेत जालना जिल्ह्यातील सर्व सहकारी बँका, पतसंस्था आणि विविध सहकारी संस्थांचे रथ सहभागी होणार असून, शहरभर स्वागत कमानी उभारण्यात येणार आहेत.

सहकार हा ग्रामीण व शेतकरी वर्गाच्या समृद्धीचा पाया आहे. शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवण्यासाठी सहकार क्षेत्राच्या बळकटीसाठी एकत्र येणे गरजेचे आहे. त्यामुळे सर्व सहकारी संस्थांचे पदाधिकारी, कर्मचारी आणि सभासदांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन सहकार चळवळ मजबूत करण्याचे आवाहन स्वागताध्यक्ष आ. खोतकर यांनी केले आहे.

# आंतरशालेय क्रिकेट स्पर्धेत कु.पाखी कोलते सर्वोत्कृष्ट खेळाडूने सन्माननीत

**मुंबई** - मिहानमधील डी.वाय.पाटील इंटरनॅशनल स्कूल स्पोर्टस अकादमीच्या मैदानावर लोकमत कॅम्पस क्लबच्या वतीने आंतरशालेय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये अनेक शाळांच्या खेळाडूंनी मोठ्या उत्साहाने भाग घेतला.यामध्ये अंतीम सामना सेंट जोसेफ कॉन्व्हेन्ट विरूद्ध द साऊथ पब्लिक स्कूल यांच्यात रंगला हा सामना अत्यंत चुरशीचा झाला.सेंट जोसेफ संघाने दहा षटकांत ५५ धावा उभारल्या.प्रतिस्पर्धी संघ द साऊथ पब्लिक स्कूलला जिंकण्यासाठी ५६ धावांची आवश्यकता होती.शेवटच्या ओवर पर्यंत प्रतिस्पर्धी संघाच्या ५२ धावा झाल्या असतांना शेवटच्या ओवरला फक्त ५ धावांची आवश्यकता होती व ३ विकेट बाकी असतांना शेवटचा ओव्हर कुमारी पाखी हर्षल कोलते वय १० वर्षे यांच्याकडे आला. अशा कठीण परिस्थितीत पाखीने उत्तम गोलंदाजी करून ३ विकेट पटकावुन संघाला विजय प्राप्त करून दिला व प्रतिस्पर्धी संघाला ५२ धावात रोखण्यात यश प्राप्त झाले व सर्वांनीच पाखीचे भरभरून कौतुक केले. कु.पाखी हर्षल कोलते सामन्यात सर्वोत्कृष्ट खेळाडू व बेस्ट बॉलर ठरली व तीचा मोठ्या थाटाने सन्मान करण्यात आला. यावेळी प्रामुख्याने माजी रजनी खेळाडू बाबुराव यादव व विदर्भाची नामांकित खेळाडू कांचन नागवानी यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

# रंगीबेरंगी भाजीपाल्यांच्या दुनियेत रमले मूकबधिर निवासी विद्यालयाचे विद्यार्थी

**जालना । प्रतिनिधी** - लायन्स क्लब ऑफ जालनाने शैक्षणिकदृष्ट्या दत्तक घेतलेल्या स्व. राजीव गांधी निवासी मूकबधिर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी एक अनोखी शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली. विद्यार्थ्यांनी सफल सीड्स या बियाणे उत्पादक कंपनीला भेट देऊन विविध प्रकारच्या भाजीपाल्यांच्या जाती, त्यांचे रंग, आकार आणि वैशिष्ट्ये प्रत्यक्ष पाहण्याचा अनोखा अनुभव घेतला.

लायन्स क्लब जालनाच्या पुढाकाराने आयोजित या शैक्षणिक भेटीत विद्यार्थी रंगीबेरंगी भाजीपाल्यांच्या दुनियेत विद्यार्थी रमले. फुलकोबीचा शुभ्र रंग, वांग्याची गडद जांभळी छटा, टरबूजाचा तजेलदार लालसर गर या साऱ्या रंगसंगतीने त्यांना भारावून टाकले. स्पर्श, दृष्टी आणि हातांनी आकार तपासत असताना त्यांच्या चेहऱ्यांवरील कुतूहल स्पष्ट दिसत होते. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन रोपांचे निरीक्षण केले. हे रोप कोणत्या भाजीचे?, या वेलीस किती दिवस लागतात फळ देण्यासाठी? असे प्रश्न हाताच्या हालचालींनी विचारले जात होते. यावर सफल सीड्सचे चेअरमन कमलकिशोर झुनझुनवाला यांनी विद्यार्थ्यांना अत्यंत सोप्या पद्धतीने माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांसमवेत लायन्स क्लबच्या सचिव मंजू श्रीमाली, जयप्रकाश श्रीमाली आणि शाळेचे शिक्षक उपस्थित होते.

विद्यार्थ्यांचे विचार, त्यांचे हावभाव, कृषी तंत्रज्ञान आणि नव्या संधींबद्दल जाणून घेण्याच्या त्यांच्या जिज्ञासेने कमलकिशोर झुनझुनवाला आणि व्यवस्थापकीय संचालक अक्षत झुनझुनवाला प्रभावित झाले. विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचे कौतुक त्यांनी कौतुक केले. शेवटी विद्यार्थ्यांना खास खाऊचे वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांची ही शैक्षणिक सहल यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका वर्षा देशमुख, आणि शिक्षक एस. जे. गोराडे, एम. यू. शेख, बी. सी. शिंपी यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांना नवे अनुभव मिळावेत यासाठी त्यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी या आगळ्या-वेगळ्या उपक्रमाचे मनःपूर्वक कौतुक केले आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांनी या सहलीत कृषी क्षेत्राचे नवे दालन अनुभवले. त्यांना शेतीविषयी केवळ पुस्तकांतून नव्हे, तर प्रत्यक्ष शेतात जाऊन शिकता आले. ही फक्त एक शैक्षणिक सहल नव्हती, तर तो होता त्यांच्या जाणिवा, अनुभव आणि भावनांनी नटलेला अविस्मरणीय प्रवास!

ज्ञान केवळ ऐकण्यापुरते मर्यादित नसते, ते अनुभवाने



समृद्ध होते, हे या भेटीत पुन्हा एकदा सिद्ध झाले. भविष्यातही अशीच सृजनशील आणि अनुभवसमृद्ध सहल विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यावर भर दिला जाईल, असे क्लबच्या सचिव मंजु श्रीमाली यांनी सांगितले.

# ज्येष्ठ नागरिकांसाठी १४५६७ राष्ट्रीय हेल्पलाईन

**जालना । प्रतिनिधी** - ज्येष्ठ नागरिकांच्या विविध समस्या आणि तक्रारींच्या निवारणासाठी केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय आणि सबळीकरण मंत्रालयामार्फत १४५६७ क्रमांकाची राष्ट्रीय हेल्पलाईन - एल्डरलाईन सेवा सर्व राज्यात सुरु करण्यात आली आहे. या टोल फ्री हेल्पलाईनच्या माध्यमातून निवृत्तीवेतन, ज्येष्ठ नागरिक योजना, कायदेशीर समस्या, बेघर आणि वृद्धांवरील अत्याचार इत्यादींची माहिती व मदत देण्यात येत आहे.

राष्ट्रीय समाज रक्षा संस्थान, केंद्रीय सामाजिक न्याय आणि सबलीकरण मंत्रालय, राज्याचा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि जनसेवा फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्याची ज्येष्ठांसाठीची ही राष्ट्रीय हेल्पलाईन जनसेवा फाऊंडेशन, पुणे यांच्याद्वारे चालविण्यात येत आहे. ही हेल्पलाईन टोल फ्री स्वरुपात असून, ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी व ज्येष्ठ व्यक्तीचे जीवनमान सुधारण्यासाठी माहिती, मार्गदर्शन आणि भावनिक आधार प्रदान करीत आहे. तसेच बेघर वृद्ध व्यक्तीस मदत म्हणून वृद्धाश्रमांमध्ये निवारा देण्यात येत आहे. आणि त्यांना पुन्हा त्यांच्या कुटूंबियांशी जोडण्याचा प्रयत्न केला जात आहे. याबाबतच्या प्रतिसाद प्रणालीने (रिस्पॉन्स सिस्टम) राज्यात संबंधित क्षेत्रात काम सुरु केले आहे. या हेल्पलाइनच्या सेवा देशभरात वाढविण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. राज्यातील सर्व वयोवृद्धांना ही सेवा उपलब्ध करण्यासाठी जनसेवा फाऊंडेशनच्या जिल्हा पातळीवर क्षेत्रीय प्रतिनिधींनी सर्व जिल्ह्यात काम सुरू केले आहे. जिल्ह्यांमध्ये एल्डर लाईन क्रमांक १४५६७ च्या सेवा वाढविण्यासंदर्भात या राष्ट्रीय हेल्पलाईनच्या कार्यकारिणी सदस्यांना प्रशासनाने सहकार्य करुन हेल्पलाईनची माहिती व जनजागृती करण्याबाबत राज्याच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने परिपत्रक जारी केले आहे. हेल्पलाईनवर मिळणाऱ्या सेवा ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याबाबत जागरूकता, निदान, उपचार, निवारा- वृद्धाश्रम, डे केअर सेंटर, पोषण विषयक, ज्येष्ठांसंबंधी अनुकूल उत्पादने, सांस्कृतिक, आध्यात्मिक, कला, करमणूक ईत्यादीची माहिती दिली जाते. वैयक्तिक आणि कौटुंबिक दोन्ही स्तरावरील कायदे विषयक प्रकरणी, मालमत्ता, शेजारी इ. विवाद निराकरण, आर्थिक, निवृत्तीवेतन, शासकीय योजनांविषयी मार्गदर्शन केले जाते. चिंता निराकरण, नातेसंबंध विषयक व्यवस्थापन, मृत्यूशी संबंधित शोक, वेळ, ताण, राग व्यवस्थापन; मृत्यूपूर्वीचे दस्तऐवजीकरण इ. विषयी जीवन व्यवस्थापनाबाबत भावनिक समर्थन दिले जाते. बेघर, अत्याचारग्रस्त वृद्ध, ज्येष्ठ व्यक्तींची सेवा व काळजी घेण्यासाठी क्षेत्रीय पातळीवर मदत केली जाते. हेल्पलाइनची कार्यप्रणाली एल्डर लाईन १४५६७ हा क्रमांक टोल फ्री आहे. एल्डर लाईनचे कार्य आठवड्यातून सर्व दिवस सुरु असते. हेल्पलाइनची वेळ सकाळी ८ ते संध्याकाळी ८ पर्यंत असते. वर्षातील ३६२ दिवस सेवा सुरु असते (२६ जानेवारी, २ ऑक्टोंबर, व १५ ऑगस्ट या राष्ट्रीय सुट्टीच्या दिवशी पूर्ण बंद असते.) हेल्पलाइनसाठी सर्व जिल्हा पातळीवर क्षेत्रीय प्रतिनिधी नियुक्त केलेले आहे.

# राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



**जालना । प्रतिनिधी** - राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्त शाहिद एहसान जाफरी मोमो. हायस्कूलमध्ये महात्मा गांधी यांना अभिवादन करण्यात आले. गुरुवार ( दि ३०) रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजलि अर्पण करण्यात आली. संस्था अध्यक्ष अब्दुल रफीक यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. या वेळी सह शिक्षक वहीद देशमुख यांनी महात्मा गांधी यांच्या जीवनावर आधारित भाषण केले.
विद्यार्थी यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्यावर अहिंसा का पुजारी गीत गायन सादर केले. कार्यक्रमास मुख्यध्यापिका फरीदा जबीन, शबाना मिर्ज़ा साजेद बेग, अन्सारी काशेफ सर, एकबाल शेख, मो. मुदस्सीर, शेख असलम, शिला व इतर कर्मचारी तसेच शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन अन्सारी काशेफ यांनी केले.

# पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यात १२० उमेदवारांची प्राथमिक निवड

**जालना । प्रतिनिधी** - तरुण-तरुणी देशाचे भवितव्य आहे व आजच्या तरुणांना कौशल्य मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत रोजगाराची संधी मिळाली पाहिजे तरच देशातील तरुण स्वतःचा विकास करून देशाचाही विकास करेल. अद्यापपर्यंत आपण जे शिक्षण आत्मसात केले आहे, त्याचे आज जीवनातील चीज म्हणजेच नोकरी मिळणार आहे, असे प्रतिपादन जे.ई.एस. कॉलेज उपप्राचार्य डॉ. महावीर सदावर्ते यांनी केले.

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व जे.ई.एस. महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने दि २९ जानेवारी, २०२५ रोजी बेरोजगार तरुणांसाठी जालना येथील जे.ई.एस. कॉलेज येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

प्रास्ताविकात जिल्हा कौशल्य विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त गणेश चिमणकर यांनी कार्यालयामार्फत तरुणांना विविध रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येत असतात. आज रोजगार मेळाव्यामध्ये २४१ जागा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत आणि उद्योजकांना कुशल मनुष्यबळाची आवश्यकता भासत असते त्यासाठी बेरोजगार तरुणांसाठी शासनामार्फत हा प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देण्यात आला आहे. या प्लॅटफॉर्म अंतर्गत जिल्ह्यातील अनेक युवक-युवतींना रोजगार प्राप्त होतो आहे. असेही सांगितले. रोजगार मेळाव्यात १० नामांकित कंपनीचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. त्यांनी मुलाखतीतून १२० उमेदवारांची विविध पदाकरिता प्राथमिक निवड केली. यात एस आर जे स्ट्रिप्स अँड पाईप्स ७, कृषिधन सीड्स २८, मातोश्री स्किल डेव्हलपमेंट सेंटर जालना ७, आई इन्शुरन्स अँड इन्व्हेस्टमेंट जालना १७, मोदी पाईप्स प्रा. लि. जालना १०, प्राईम सोल्युशन लिमिटेड (सलाम किसान) जालना २५, विक्रम टी प्रोसेसर प्रा. लि. जालना १४, देवअश्व होंडा शोरूम जालना ६, स्पंदना स्फूर्ति फायनान्शियल जालना ४, भुवन हुंदाई जालना २ अशी उमेदवारांची निवड केली गेली.



या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमोल परिहार यांनी केले आणि आभार सुरेश बहुरे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता विभागाचे कौशल्य विकास अधिकारी भुजंग रिठे तसेच अमोल बोरकर, कैलास काळे, रविंद्र पाडमुख, विशाल जगरवाल, दिनेश उढाण, सोमेश शिंदे, अमर तुपे, शालिकराम वाघ आणि जे.ई.एस.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, डॉ. सुनिल इंदुरकर, डॉ. सुशांत देशमुख व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. असे कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# स्वामी विवेकानंद महाविद्यालयात भारतीय सुजाण -सजग नागरिकत्व जागर व अभियान साजरा

**मंठा । प्रतिनिधी** - येथील स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर व भारतीय सुजाण -सजग नागरिकत्व जागर अभियान महात्मा गांधी सर्वोदय भवन छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२६ जानेवारी २०२५ रोजी प्रजासत्ताक दिनी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या युवकांना महाविदयालयातील राष्ट्रध्वज वंदन कार्यक्रम प्रसंगी प्राचार्य डॉ माणिकराव थिटे यांच्या वतीने भारतीय सुजाण - सजग नागरिकत्वाची दीक्षा - प्रतिज्ञा देण्यात आली व अभियान साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रा. डॉ. संतोष वानखेडे, यांनी.सुजाण-सजग नागरिकाची वैशिष्ट्ये, कर्तव्य व नागरिकाचे अधिकार, आदि विषयावर प्रेरणादायी समायोजित भाषण झाले. तसेच उपप्राचार्य डॉ. सुधाकर जाधव यांचेही प्रेरणादायी भाषण झाले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ . माणिकराव थिटे, उपप्राचार्य डॉ. सुधाकर जाधव, उपप्राचार्य डॉ. सदाशिव कमळकर,उपप्राचार्य प्रा. संभाजी तिडके उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा डॉ तुषार धोंडगे यांनी केले व प्रा डॉ पांडुरंग नवल यांनी युवकांना भारतीय सुजाण - सजग नागरिकत्वाची दीक्षा - प्रतिज्ञा देण्यात आली. कार्यक्रमासाठी प्रा.डॉ. नेताजी मुळे प्रा डॉ रमेश शिंदे, प्रा. के. एम कांबळे, प्रा डॉ पंढरीनाथ काकडे प्रा. संतोष रंजवे प्रा डॉ भारत धोत्रे, प्रा डॉ राजेंद्र काकडे सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा डॉ राजेश गायकवाड प्रा चारुलता पाटील, प्रा डॉ दक्षता देशमुख, प्रा डॉ दिपमाला गायकवाड, प्रा दीप्ती देशमुख कार्यालयीन अधिक्षक श्री दत्तात्रय कडूकर ,मुख्य लिपीक अशोक मुळे उपस्थिती होते. कार्यक्रमात कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांची उपस्थिती होती .




# हुतात्मा दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात हुतात्म्यांना आदरांजली



**जालना । प्रतिनिधी** - हुतात्मा दिनानिमित्त जिल्हाधिकारी यांनी जालना जिल्हाधिकारी कार्यालयात दोन मिनिटे मौन पाळून हुतात्म्यांना आपली आदरांजली वाहिली. यावेळी अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी यांनी देखील दोन मिनिटे मौन पाळून हुतात्म्यांचे स्मरण केले.

## पालकमंत्री पंकजा मुंडे यांचा जालना जिल्हा दौरा

**जालना । प्रतिनिधी** - राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे या जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. शुक्रवार दि.३१ जानेवारी २०२५ रोजी रात्री ८ वाजता वाहनाने शासकीय विश्रामगृह जालना येथे आगमन व राखीव. शनिवार दि. १ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १०.५० वाजता शासकीय विश्रामगृहातून शासकीय वाहनाने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रयाण. सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आगमन व जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीस उपस्थिती. सोईनुसार जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथून शासकीय वाहनाने छत्रपती संभाजीनगरकडे प्रयाण करतील.

## कृषी महाविद्यालयात नाटिका सादरीकरणाने प्रेक्षकांचे अश्रू अनावर

**जालना । प्रतिनिधी** - ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त कृषी विज्ञान केंद्र खरपुडी, जालना येथे कृषी भूषण भगवान काळे, विश्वस्त मराठवाडा शेती सहाय्य मंडळ, जालना यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. मराठवाडा शेती सहाय्य मंडळ संचलित आमची शाळा, बळीराजा अॅकॅडमी, कृषी तंत्र विद्यालय तसेच कृषी महाविद्यालय खरपुडीतील विद्यार्थ्यांनी प्रजासत्ताक दिनानिमित्त कृषी विज्ञान केंद्र, खरपुडी येथील प्रांगणामध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. कृषी महाविद्यालय खरपुडीतील विद्यार्थ्यांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला व जास्तीत जास्त संख्येने सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख चौधरी मॅडम, प्राध्यापिका चाटे मॅडम, प्रा. सहाने सर यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर क्राईम नाटिका, देशभक्तीपर गीतगायन, दि रियल हिरो- आर्मी मॅन इ. कार्यक्रमांचे सादरीकरण केले. तृतीय वर्षातील विद्यार्थिनींनी सादर केलेल्या द रियल हिरो-आर्मी मॅन या नाटीकेने भारतातील लष्करी जवानांचा खडतर जीवन प्रवास दाखविला. हा जीवन प्रवास बघून प्रेक्षकांचे अश्रू अनावर झाले. कार्यक्रमास डॉ. देशमुख, खरात, कोळकर, सोनुने, शिक्षक वृंद, शिक्षिका, प्राध्यापक, प्राध्यापिका, इतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

# बुलढाण्यात रविवारी वधू वर पालक बैठकीचे आयोजन

**बुलढाणा । प्रतिनिधी** - दिवाळी झाल्यानंतर लग्न समारंभाला सुरुवात होते, हे हेरून मराठा समाजातील मुला मुलींच्या लग्नासाठी जुळवणी करता यावी म्हणून श्री मिसाळ यांच्या माऊली हाईट्स ,डॉक्टर राजेंद्र गोडे यांच्या निवासस्थानासमोर. व एम एस सी बीच्या बाजूला चिखली रोड बुलढाणा येथे २ फेब्रुवारी रविवार रोजी दुपारी ठीक १ वाजता महत्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीला उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ श्री अण्णासाहेब म्हळसणे पाटील यांनी केले.

विवाह जुळून येणे ही एक मोठी समस्या झाली आहे. सर्वच जाती समाज घटकातील तरुणांपुढे आज लग्न ही मोठी समस्या आहे. अशा वेळी ही सामाजिक समस्या हेरून महाराष्ट्र मराठा सोयरीक या लोक चळवळीचे संकल्पक श्री सुनील जवंजाळ पाटील यांनी राज्यभर प्रयत्न सुरू केले आहे. शिवजयंतीच्या पर्वावर १९ फेब्रुवारीला बोदवड जि जळगाव येथे मेळाव्याचे आयोजन केलेले आहे.राजकारण विरहित कार्य त्यांनी गेल्या कितीतरी वर्षापासून सुरूच ठेवले आहे. समाज घटकातील सर्वच मुला-मुलींना योग्य स्थळ मिळावे यासाठी त्यांचा प्रयत्न नाविन्यपूर्ण ठरला आहे. महिन्याच्या प्रत्येक पहिल्या रविवारी वधु वर पालक बैठकीचे आयोजन बुलढाण्यात करण्यात येते. ठरल्यानुसार बुलढाणा येथे चिखली रोड येथील डॉक्टर गोडे यांच्या निवासस्थान समोर, माऊली हाईट्स बिल्डिंगमध्ये २ फेब्रुवारी रविवार रोजी दुपारी ठीक १ वाजता ही बैठक होत आहे. या बैठकीमध्ये विवाह इच्छुक मुला मुलींच्या पालकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. या बैठकीला मराठा सोयरीकचे मान्यवर मार्गदर्शन सुद्धा करणार आहेत. बैठकीला येताना पालकांनी आपल्या पाल्यांचे बायोडाटा सोबत आणावे. ५ जानेवारीला बुलढाणा येथे संपन्न झालेल्या वधू वर परिचय मेळाव्यातील बायोडाटा ही त्यांना बघता येतील.

बैठकीमध्ये बोदवड शहरामध्ये शिव जयंती पर्वावर लवकरच होऊ घातलेल्या वधू वर परिचय मेळाव्याचे प्रचाराचे नियोजन करन्यात येईल.

# शिवनगर येथील झोपडपट्टीमधील घरे पाडू नका

## रिपब्लीनक पार्टी ऑफ इंडीयाच्या शिष्टमंडळाचे आयुक्तांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील शिवनगर येथील झोपडपट्टीमधील घरे ही १९९५ पासून अस्तित्वात आहेत. परंतु, रस्त्याच्या कामामुळे या भागातील नागरीकांच्या घरावर मार्कींग करण्यात आले. त्यामुळे शिवनगर येथील झोपडपट्टीतील कोणतीही घरे पाडण्यात येऊ नये अशी मागणी या भागातील नागरीकांनी आयुक्ताकडे बुधवार दि. २९ जानेवारी २०२५ रोजी दुपारी १२ वाजता केली आहे.



शिवनगर येथील झोपडपट्टीमधून जिल्हा सम ान्य रुग्णालय ते राष्ट्रमाता कॉलेजकडे जाणारा रस्ता तयार करण्यात येत आहे. परंतु, या भागातून जाणार्या जुन्या रस्त्यावरुन रस्ता तयार न करता लोकांची घरे पाडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे अनेकांची घरे पाडली जाणार आहेत. त्यामुळे लोकांवर बेघर होण्याची वेळ येणार आहे. सदरील गोरगरीबांची घरे पाडू नये यासाठी रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडीयाचे महाराष्ट्र संघटक सचिव ॲड. ब्रम्हानंद चव्हाण यांनी पुढाकार घेत झोपडपट्टी धारकांची भेट घेतली. दरम्यान झोपडपट्टी धारकांच्या झोपड्या पाडू नयेत यासाठी ॲड. ब्रम्हानंद चव्हाण यांनी शिष्टमंडळासह आयुक्तांची भेट घेतली. या शिष्टमंडळात गणेशसेठ रत्नपारखे, महेंद्र रत्नपारखे, रावसाहेब रत्नपाखे, पांडूरंग हिवाळे, अशोक रत्नपारखे, अनिल बनकर, गौतम शेवाळे, सायबा गुढे, दैवताबाई वानखेडे, लिलाबाई रत्नपारखे, शोभाबाई भिसे, वंदना हिवाळे, सविता हिवाळे यांच्यासह महिला आणि पुरुषांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

शिवनगर येथील झोपडपट्टीमध्ये सुमारे १५० ते २०० घरे असून ते १९९५ पासून राहतात. त्यांनी पुर्वीच्या नगरपालिकेला आणि आत्ताच्या महानगरपालिकेला नियमित टॅक्स भरला असून ते आजही भरीत आहेत. या ठिकाणी नागरी सुविधा देखील देण्यात आल्या आहेत. असे असतांनाही झोपडपट्टीम धील कुटुंबांना बेघर करुन त्यांच्यावर उपासमारीची वेळ आणली जात आहे. हा प्रकार मानवी हक्काविरोधी असून अन्न, वस्त्र, निवारा या शाससनाच्या धोरणा विरोधात आहे. त्यामुळे या ठिकणी घरे न पाडता त्यांना सुविधा देत संरक्षीत करण्यात यावे अशी मागणी ॲड्र. ब्रम्हानंद चव्हाण यांनी केली.

# कर न भरणाऱ्या नागरिकांवर जालना मनपाची टांगती तलवार

## मंठा रोडवर सिमेंटच्या गोडाउनची स्थावर आणि जंगम मालमता जप्त




**जालना । प्रतिनिधी -** शहरातील कर न भरणाऱ्या लोकांवर महानगरपालिकेची टांगती तलवार असून थकबाकी न भरणाऱ्याना थेट कारवाईला सामोरे जावं लागते आहे. गुरुवार (दि ३०) रोजी दुपारी एक वा. च्या सुमारास जालन्यात मालमत्ता कर न भरणाऱ्यावर जालना महानगरपालिकेने थेट जप्तीची कारवाई केलीय. मंठा रोडवर डी.मार्ट जवळ असलेल्या एका सिमेंटच्या गोडाऊनची स्थावर आणि जंगम म ालमता जप्त केली आहे. २०१८ पासून २०२५ पर्यंतची थकीत कर ५ लाख ९८ हजार रुपये असून महानगरपालिकेने त्यांना वेळोवेळी नोटीसा बजावल्या असल्या तरीही दाद न दिल्याने अखेर ही कारवाई करावी लागली असल्याचे मनपा प्रशासनाने सांगितले आहे.ही कारवाई महानगरपालिका आयुक्त संतोष खांडेकर आणि अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपुत यांच्या म ार्गदर्शनाखाली सहायक आयुक्त अपर्णा जाधव यांच्यासह टीममधील कर अधिकारी राजेश कुरलिये, कर निरीक्षक बी सी राठौड, लक्ष्म ीकांत नाकाडे, वसुली लिपिक विकास जैस्वाल आणि पथकातील इतर कर्मचारी उपस्थित होते.

# अखंड हरिनाम सप्ताह शिवमहा पुराण कथा व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

**परतूर । प्रतिनिधी -** अखंड हरिनाम सप्ताह दि.२७/०१/२०२५ पासून श्री गंगाभारती म हाराज आश्रम एवम बालानंद बालसंस्कार आश्रम सिंगोना ता.परतूर येथे प्रारंभ झाला आहे.शिवम हापुराण कथा प्रवक्ते श्री. ह.भ.प. बालासाहेब महाराज पठाडे. श्री. ह.भ.प. भागवताचार्य राधेश्याम महाराज श्री. ह.भ.प. ज्ञानेश्वर म ाऊली आळंदीकर.श्री. ह.भ.प. संग्राम (बापू) म. भंडारे. भागवताचार्य श्री. ह.भ.प.सोपान म.सानप शास्त्री. श्री. ह.भ.प. अनिल म.चेके. श्री. ह.भ.प. विलास म. गेजगे यासर्व म हाराजाचे प्रत्येक दिवशी वेगवेगळ्या दैनंदिन कार्यक्रम,काकडा भजन, श्रीज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, श्रीमद् भागवत कथा, हरिपाठ, हरि किर्तन ,जागर, ठेवण्यात आले आहे. व दि. ०४/०२/२०२५, सोमवार रोजी श्री. ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज पाटील यांचे सकाळी १० ते १२ यावेळेत काल्याचे किर्तन होईल.नंतर म हाप्रसाद होइल तरी सर्व भाविक भक्तांनी किर्तन श्रवणाचा व महाप्रसादाचा अवश्य लाभ घ्यावा. यजमान कैलास सुजानराव मुळे, तर कांतराव यशवंतराव सोळंके, साळुजी सत्यभान सोळंके, राजेभाऊ भिसे यांच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. अखंड हरिनाम सप्ताह सोहळा निमित्त भाविकांची सिंगोणा येथे गर्दी होत आहे.

# झेडपीच्या शाळेत आनंदनगरी

**मंठा । प्रतिनिधी -** मंठा तालुक्यातील जि.प.पाटोदा शाळेत २८ जानेवारी रोजी आनंदनगरी घेण्यात आली. १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांनी पालकांच्या सहकार्याने स्टॉल लावीत ५३ दुकाने थाटली होती. अस्सल गावरान पदार्थ, स्टॉलची सुरेख मांडणी, प्रत्येक स्टॉलला आकर्षक नाव, दुकानदारांच्या डोक्यावर आकर्षक टोपी आणि विद्यार्थी पालकांसह ग्रामस्थांचीही गर्दी हे २०२५ च्या आनंदनगरीचे वैशिष्ट्ये दिसून आले. उद्धाटन सरपंच प्रतिनिधी अशोकराव बोराडे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, सदस्य, ग्रामस्थ, शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनातील अनुभव प्रत्यक्ष अनुभवता यावेत या उद्देशाने आनंदनगरी या उपक्रमाचे आयोजन केले होते. याशिवाय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा प्रयत्न शाळा करीत असून पहिलीपासून स्पर्धा परीक्षेची तयारी, आनंददायी शनिवार, पालक संवाद, अधिकारी मार्गदर्शन, कृतीयुक्त शिक्षण, क्रीडाशिक्षण, भाषण तयारी, व्यक्तिमत्व विकास असे विविध अभिनव उपक्रम उपशिक्षणाधिकारी



विपुल भागवत, गटसमन्वयक के. जी.राठोड, केंद्रप्रमुख डी.ए.चव्हाण, मुख्याध्यापक एस.डी.तोटेवाड, यांच्या म ार्गदर्शनाखाली व ग्रामस्थ व पालकांच्या सहकार्याने राबविण्यात येत आहेत अशी माहिती प्राथमिक शिक्षक गंगाधर वानोळे यांनी दिली. विद्यार्थी उत्तम प्रतिसाद देत आहेत.

# जिल्ह्यातील मच्छीमारांसाठी मार्गदर्शनपर कार्यशाळा संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** लक्ष्मणराव इनामदार नॅश्नल अकॅडमी फॉर को ऑपरेटिव्ह रिसर्च न्ड डेव्हलपमेंट प्रशिक्षण केंद्र व सहकार मंत्रालय आणि शासनाच्या मत्स्यव्यवसाय विभागाच्या संयुक्त विद्यमाने जालना येथील जे.ई.एस. म हाविद्यालयात दि.२९ जानेवारी २०२५ रोजी जिल्ह्यातील मच्छिमारांसाठी एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली.

कार्यशाळेस मत्स्यव्यवसाय प्रादेशिक उपायुक्त विजय शिखरे, उपप्राचार्य डॉ.महाविर सदावर्ते, डॉ.फाळके, म त्स्यव्यवसाय सहायक आयुक्त रश्मी नाईक, उपसंचालक अक्रिष्टा रितु, प्रतिक दंडीमे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यशाळेत गुणवत्तापूर्ण बीज निर्मिती, बीज संकलन, म च्छीचे कोल्डस्टोरेज, मत्स्य विपणन, माशांची बाजर पेठेतील उपलब्धता, राष्ट्रीय स हकारी विकास महामंडळाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. यावेळी विविध मच्छीमार संस्थेच्या मच्छीमार प्रशिक्षणार्थ्यांची उपस्थिती होती.

# जिल्हा उद्योग केंद्राच्यावतीने कार्यशाळा संपन्न

**जालना । प्रतिनिधी** - जालना ते छत्रपती संभाजीनगर हे पुढील काळात औद्योगिक हब होण्याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या वक्तव्याचा दाखला देत जालना ड्रायपोर्टच्या माध्यमातून भविष्यात वेगाने निर्यात होवू शकते. जालना जिल्ह्यात उत्पादन तसेच इतर देशांना होणाऱ्या निर्यातीत वाढ होण्याची मोठी संधी उपलब्ध होणार आहे. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले.

भारत सरकारच्या प्रत्येक जिल्हा हा निर्यात केंद्र या उपक्रमातंर्गत जालना जिल्हा उद्योग केंद्राच्यावतीने जिल्हास्तरीय एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात दि.२९ जानेवारी २०२५ रोजी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शन व अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. यावेळी उद्योग सहसंचालक बी.टी.यशवंते, महाव्यवस्थापक योगेश सारणीकर, सहायक व्यवस्थापक पांडूरंग बावणे, अमोल मोहिते यांची प्रमुख उपस्थिती होती.

राज्य निर्यात धोरण अंतर्गत उद्योजकांना देय असणाऱ्या प्रोत्साहनाबाबत तसेच निर्यात धोरणाची थोडक्यात माहिती श्री.यशवंते यांनी दिली. कृषी आधारित उत्पादनांची निर्यात करण्यासंबंधी अम ोल मोहिते यांनी जिल्ह्याच्या निर्यातीसंबंधी सादरीकरण केले. व मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेस उद्योजक, निर्यात शेतकरी उत्पादक संघटना उपस्थित होते. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.